21 JAN 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय धोरणात चाकोरीबाहेरचे शिक्षण

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवराज महाविद्यालयात शैक्षणिक धोरणाचा जागर



गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्था पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

गडहिंग्लज, ता. २० :' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थीकेंद्रित आहे. चाकोरीबाहेरच्या शिक्षणाची तरतूद या नव्या धोरणामध्ये असल्याने सर्वगुण संपन्न विद्यार्थी घडण्यासाठी मदत होणार आहे', असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठांतर्गत गुणवत्ता हमी व येथील शिवराज महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० स्कूल कनेक्ट अभियान कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवराज विद्या संकुलचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते. सचिव डॉ. अनिल कुराडे व उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिर्के म्हणाले, 'नव्या राष्ट्रीय धोरणामध्ये विद्यार्थी सक्षम व रोजगारक्षम होणार आहे. विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक व्यवस्थेत कौशल्यज्ञान मिळवून परिपूर्ण घडण्याची संधी आहे. आजचा विद्यार्थी रोजगारक्षम व इतरांना रोजगार देणारा झाला पाहिजे, यासाठी या धोरणात प्रामुख्याने विचार केला आहे. भारतीय ज्ञान परंपरा अगाध आहे. त्याचा अंतर्भावही धोरणात केला आहे. अधिक सक्षम होण्यासाठी विद्यार्थ्यांनी या धोरणाचा लाभ घ्यावा.'

अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांनी नव्या पिढीला या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची का गरज आहे. याबाबत पालक-विद्यार्थी संवाद होण्याची गरज असल्याचे सांगितले. सचिव डॉ. कुराडे यांनी विद्यार्थ्यांना सक्षम करणाऱ्या अभ्यासक्रमाची आज गरज असून, विद्यार्थीहिताच्या अभ्यासक्रमांना परवानगी देण्याची मागणी केली.

प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. ए. एम. हसुरे यांनी करून दिला. यावेळी प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. किरण पोतदार, प्रा. किशोर आदाटे, संदीप कुराडे, विक्रम शिंदे, आदींसह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. अल्ताफहुसेन नाईकवाडे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
लोकमत



महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी बजावणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

# क्रीडा महोत्सवातील यशस्वी खेळाडूंचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात उज्ज्वल कामगिरीबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंचा शुक्रवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार केला.

स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स (पुरुष व महिला) संघाने सर्वसाधारण विजेतपद, बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघाने तृतीय क्रमांक, टेबल टेनिस (पुरुष) संघाने तृतीय क्रमांक, व्हॉलीबॉल (पुरुष) संघाने द्वितीय क्रमांक असे देदीप्यमान यश प्राप्त केले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अभिनंदन करत क्रीडापटूंना आवश्यक अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. सुनील चव्हाण यांनी अहवालाचे वाचन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. एन. डी. पाटील, डॉ राजेंद्र रायकर, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. राहुल इंगळे, डॉ. सविता भोसले, डॉ. इब्राहीम मुल्ला, अजय मराठे, सचिन पाटील उपस्थित होते. प्रा. किरण पाटील, प्रा. सुचय खोपडे यांनी सूत्रसंचालन केले.

21 JAN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रित

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : राष्ट्रीय शैक्षणि धोरण कार्यशाळा शिवराज महाविद्यालयात संपन्न

प्रतिनिधी
गडहिंग्लज

विद्यार्थी सर्वगुण संपन्न व्हावे यासाठी त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. चाकोरी बाहेरच्या शिक्षणाची तरतूद नव्या राष्ट्रीय धोरणामध्ये करण्यात आली आहे. नव्या राष्ट्रीय धोरणामध्ये विद्यार्थी सक्षम व रोजगारक्षम व्हावा याची तरतूद करण्यात आली आहे. परिपूर्ण विद्यार्थी घडण्याची संधी असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत गुणवत्ता हमी व शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० स्कुल कनेक्ट अभियान' कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते. सचिव डॉ. अनिलराव कुराडे व उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी स्वागत प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी केले. कुंडीतील रोपट्याला मान्यवरांच्या हस्ते पाणी घालून व शिवाजी विद्यापीठ गौरव गीत गायनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.



गडहिंग्लज : कार्यशाळेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार करताना प्रा. किसनराव कुराडे, शेजारी डॉ. अनिलराव कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम, ॲड. दिग्विजय कुराडे, प्रा. बिनादेवी कुराडे, प्रा. किशोर आदाटे.

आपली भारतीय ज्ञान परंपरा अगाध आहे. त्याचा अंतर्भाव करून विद्यार्थी अधिक सक्षम व्हावा शिवाय आपला समाज ज्ञानाधीष्टीत झाला पाहिजे यासाठी हे शैक्षणिक अभियान का गरजेचे आहे त्यामध्ये विद्यार्थ्यांना कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून या राष्ट्रीय धोरणाचा लाभ विद्यार्थ्यांना घेण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. आज उच्च शिक्षणाच्या प्रवाहात अधिकाधिक विद्यार्थी यावा यासाठी हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. १८ ते २३ वयोगटातील पन्नास टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणात आली पाहिजे यासाठी या शिक्षणपद्धतीत बदल करून हे धोरण आमलात आणले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांनी अध्यक्षीय भाषणातून नव्या पिढीला या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची का गरज आहे ? याबाबत पालक-विद्यार्थी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. शिवाय विद्यार्थी सक्षम व्हावा यासाठी योग्य ते उपक्रम राबविण्याची गरज ओळखून आमचे प्रेरणास्थान आदरणीय शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कार्याचा वारसा आपण चालवित आहात याबाबत त्यांनी धन्यता व्यक्त केली.

सचिव डॉ. अनिलराव कुराडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना सक्षम करणाऱ्या अभ्यासक्रमाची आज गरज आहे. नव्या अभ्यासक्रमाची गरज ओळखून विद्यार्थी हिताच्या अभ्यासक्रमांना परवानगी देण्यात यावी तसेच विद्यार्थी हिताचा विचार करून शिवराज विद्या संकुलासाठी आवश्यक असे सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

सूत्रसंचालन डॉ. अल्ताफहुसेन नाईकवाडे यांनी केले तर आभार प्रा. तानाजी चौगुले यांनी केले. या कार्यशाळेस प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. किरण पोतदार, प्रा. किशोर आदाटे, संदीप कुराडे, विक्रम शिंदे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

21 JAN 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विस्मृतीत चाललेल्या कंदमुळांची ओळख व्हावी

## व्ही. एन. शिंदे : प्रदर्शनात ७० कंदमुळे, १६० हून अधिक औषधी वनस्पती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पौराणिक काळापासून माणूस कंदमुळांचा अन्न म्हणून वापर करत आला आहे, पण अलीकडील काळात आरोग्यासाठी उपयुक्त अशा कंदमुळांची ओळख विसरत चालली आहे. 'निसर्ग अंकुर' व 'कोल्हापूर वुई केअर' संस्थांच्या माध्यमातून अशा प्रकारच्या प्रदर्शनातून कंदमुळांची ओळख होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

'निसर्ग अंकुर' यांच्या मार्गदर्शनाखाली 'कोल्हापूर वुई केअर व 'एनजीओ कम्पॅशन २४' यांच्या वतीने शनिवारी शहाजी महाविद्यालयात कंदमुळे व औषधी वनस्पतींचे प्रदर्शन भरवण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रदर्शनात ७० हून अधिक कंदमुळे, १६० हून अधिक औषधी वनस्पतींचा समावेश आहे. हे प्रदर्शन आज, रविवारपर्यंत चालणार आहे.

प्रास्ताविकात डॉ. मधुकर बाचुळकर यांनी कंदमुळांची माहिती दिली. 'कोल्हापूर वुई केअर'चे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी सूत्रसंचालन केले. गडहिंग्लजचे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भूषण पाटील, मंजिरी कपडेकर, अभिजीत पाटील, आरती रायगांधी, अमृता वासुदेवन, सुशांत टकळक्की, रोहिणी पाटील, भक्ती डकरे, आदी उपस्थित होते.

खासदार धनंजय महाडीक, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी प्रदर्शनाला भेट दिली.





शहाजी महाविद्यालयात शनिवारी कंदमुळे व औषधी वनस्पतींचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. यामध्ये वेगवेगळ्या आकाराची भली मोठी कंदमुळांकडे लहान मुले कुतूहलाने पाहत होते.

### प्रदर्शनात काय पाहाल....

**औषधी वनस्पती :** सताप, गुगुळ, कुसर, कोष्ट कोलीजंन, लक्ष्मी तरु, सागर गोटा, बेडकी पाला, अक्कल कारा, दमवेल, काजरा.

**कंदमुळे :** कणगा, काटे कणग, कोराडू, करांदा, वराहकंद, वासकंद, पासपोळी, शेंडवेल, आळसी, शेवळा, सुरण.

**कंद :** कंदिका, कंदक, मोठा कासार अळू, काळा अळू, हिरवा अळू, पांढरा पेरव, उंडे, शेंडवाळे.

हळदीचे कंद : काळी हळद, आंबेहळद.

21 JAN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सत्तर प्रकारची कंदमुळे अन् १६० औषधी वनस्पतींचा खजिना खुला

## कंदमुळे व औषधी वनस्पती प्रदर्शनाचे उद्घाटन : दोन दिवस चालणार प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दुर्मीळ अशा सत्तरहून अधिक कंदमुळांचे आणि १६० हून अधिक औषधी वनस्पतींचे माहितीपूर्ण प्रदर्शन खुले झाले आहे. कणगा, काटेकणग, कोराडू, करांदा, वराहकंद, वासकंद, पासपोळी असे कंद येथे मांडण्यात आले आहेत. दसरा चौकातील शहाजी कॉलेज सभागृहात शनिवारी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. पहिल्याच दिवशी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

औषधी वनस्पती, रानकंदमुळांची ओळख आणि त्यांचा आहारातील वापर याबाबतची माहिती शहरवासीयांना आणि खेड्यापाड्यातील ग्रामस्थांना व्हावी, शेतकऱ्यांनी त्यांची लागवड करावी या उद्देशाने निसर्गअंकुर संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर वुई केअर आणि एनजीओ कम्पॅशन २४ ह्या संस्थेने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. २० आणि २१ जानेवारी रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहात हे प्रदर्शन सर्वांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ७ यावेळेत खुले राहणार आहे.



प्रदर्शनातील दुर्मीळ कंदमुळे. (छाया : पप्पू अत्तार)

शनिवारी सकाळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे ह्यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, गडहिंग्लज प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे उपस्थित होते. खासदार धनंजय महाडिक यांनीही प्रदर्शनाला भेट दिली.

**प्रदर्शनात मांडलेल्या वनस्पती व कंदमुळे**

प्रदर्शनात सताप, गुगुळ, कुसर, कोष्ट कोलीजंन, लक्ष्मी तरू, सागर गोटा, बेडकी पाला, अक्कल कारा, दमवेल, काजरा ह्या दुर्मीळ अशा औषधी वनस्पती तसेच शेंडवेल, आळसी, शेवळा, सुरण या वनस्पतींची कंदमुळे, कंदिका आणि कंदक तसेच मोठा कासार अळू, काळा अळू, हिरवा अळू, पांढरा पेरव, उंडे, शेडवाळे असे अळूंचे विविध प्रकार आणि त्यांचे कंद, त्याचबरोबर काळी हळद, आंबेहळद यासारखे हळदीचे विविध प्रकार व त्यांचे कंद व औषधी वनस्पतीची मांडणी करण्यात आली आहे. तसेच १५ ते २० प्रकारचे कंद विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

कोल्हापूर वुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रदर्शनाचा उद्देश आणि माहिती डॉ. मधुकर बाचुळकर यांनी उपस्थितांना दिली. यावेळी शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, मंजिरी कपडेकर, अभिजित पाटील, आरती रायगांधी, अमृता वासुदेवन, सुशांत टक्कळकी, गार्डन क्लबचे सदस्य रोहिणी पाटील आणि भक्ती डकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

21 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शहाजी महाविद्यालयात आयोजित औषधी वनस्पती व कंदमुळे महोत्सव पाहण्यासाठी शनिवारी गर्दी झाली होती.
(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# झाडे पळवतात आजारांना दूर

## डॉ. व्ही. एन. शिंदे : शहाजी महाविद्यालयात कंदमुळे महोत्सव सुरू

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : ''निसर्गातील झाडे, पाने, फुले आणि फळे ही कल्पतरू आहेत. मानवाच्या शारीरिक, मानसिक आजारांना ती दूर पळवतात. इच्छा, आकांक्षा पूर्ण करतात. त्यामुळे वृक्षांबाबत जनजागृती वाढली पाहिजे. त्यासाठी कोल्हापुरात वृक्ष महोत्सव आयोजित करण्याची गरज आहे,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

### बहुगुणी, औषधी वनस्पतींचा समावेश

- पश्चिम घाटात आढळणाऱ्या नरक्या अमृता, लक्ष्मीतरू या कर्करोगावर बहुगुणी औषधी वनस्पतींचा महोत्सवात समावेश आहे.

शहाजी महाविद्यालयात आयोजित औषधी वनस्पती व कंदमुळे महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, गडहिंग्लजचे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे उपस्थित होते. निसर्गअंकुर संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर वुई केअर आणि एनजीओ कम्पॅशन २४, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, गार्डन्स क्लब, रोट्रॅक्ट-कोल्हापूर झोन, मंजिरी कपडेकर कुकिंग क्लासेस, इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर मिलेनिअल्स, यूथ अँनेक्स, वुई केअर हेल्पलाईन संस्थांतर्फे औषधी वनस्पती व कंदमुळांच्या महोत्सवाचे आयोजन केले आहे. हा महोत्सव रविवार (ता. २१) पर्यंत सकाळी दहा ते सायंकाळी सातपर्यंत खुला असेल. प्रदर्शनात ७० हून अधिक कंदमुळे आणि १६० हून अधिक औषधी वनस्पतींचा समावेश आहे. दरम्यान, खासदार धनंजय महाडिक यांनी प्रदर्शनाला भेट दिली. वुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मधुकर बाचुळकर यांनी महोत्सवाचा उद्देश सांगितला. या वेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, मंजिरी कपडेकर, अभिजित पाटील, आरती रायगांधी, अमृता वासुदेवन, सुशांत टक्कळकी, रोहिणी पाटील आणि भक्ती डकरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024

लोकमत

# 'अन्न, वस्त्रपेक्षाही हवा महत्त्वाची'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांपेक्षाही महत्त्वाचा घटक म्हणजे हवा आहे. ही हवा शुद्ध राहण्यासाठी वृक्षारोपण करताना देशी झाडांना प्राधान्य देण्याची गरज शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केली. भालचंद्र चिकोडे ग्रंथालयात "पुस्तकांवर बोलू काही" या कार्यक्रमात ते बोलत होते.

ग्रंथालयाचे अध्यक्ष राहुल चिकोडे यांनी प्रास्ताविक केले. योगेश चिकोडे, मधुरिमा चिकोडे, सचिन साळोखे, जयदीप मोरे, अतुल चव्हाण, कृष्णा आतवाडकर, विजय अग्रवाल, श्रीधर साळोखे यांनी संयोजन केले.

21 JAN 2024
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा इतिहासासाठी मोडी लिपी गरजेची

## डॉ. अवनीश पाटील : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठा इतिहासाच्या संशोधनामध्ये मोडी लिपीच्या अभ्यासाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र आणि पुराभिलेख संचालनालय यांच्या वतीने "मोडी लिपी प्रचार व प्रसार" या विषयावर



शिवाजी विद्यापीठात मोडी लिपी कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात डॉ. अवनीश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

एकदिवसीय कार्यशाळा विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात झाली. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, मराठा इतिहासाच्या मोडी लिपीतील साधने संपूर्ण भारतातील अभिलेखागार त्याबरोबर लंडन, पॅरिस, स्पेन, हॉलंड येथील संग्रहालयातील मोठ्या प्रमाणात मोडी कागदपत्रांचा संग्रह आहे. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी प्रास्ताविक केले. अमोल महल्ले यांनी मोडी लिपीच्या अक्षर वळण बाराखडीचे प्रशिक्षण, अक्षर ओळख करून दिली. गणेश खोडके यांनी विविध कालगणना, रेघी हिशोबाची पद्धत, जमीन मोजण्याची पद्धत आदींवर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप यांनीही मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
लोकमत

# सहकार क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची गरज : काकडे



कोल्हापूर : सहकार क्षेत्राचे जाळे व्यापक असून, या क्षेत्राला कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये बहुस्तरीय संधींची उपलब्धता असून, त्यांचा युवा पिढीने लाभ घेण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन सहकारी संस्था कोल्हापूर विभागाचे विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, बँक ऑफ इंडिया चेअर आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्यातर्फे 'सहकार क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' या विषयावर आयोजित कार्यशाळेत विशेष अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत, डॉ. राजन पडवळ यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संजय परमणे, रोजगार कक्ष समन्वयक, शिक्षक तसेच वाणिज्य व व्यवस्थापन, एमबीए आणि अर्थशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठास सोमवारी सुट्टी जाहीर

कोल्हापूर : श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठादिनानिमित्त सोमवार (दि.२२) रोजी शिवाजी विद्यापीठास सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग व संलग्न महाविद्यालये मान्यताप्राप्त संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतचे परिपत्रक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठाचे आजअखेर पदवी, पदव्युत्तर ५९१ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तरच्या सुमारे ५९१ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ लॉ, मास्टर ऑफ एज्युकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागांमध्ये झाल्या. परीक्षेला २ हजार ३१९ बसले. त्यापैकी दोन विद्यार्थी अनुपस्थित होते. दरम्यान, दि. १९ रोजी बॅचलर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024

पुढारी

# विद्यापीठ सत्र परीक्षेला २ हजार ३६३ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला २ हजार ३६३ विद्यार्थी उपस्थित होते. १०१ विद्यार्थी गैरहजर राहिले. शनिवारी बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, मास्टर ऑफ एज्युकेशन, बीएड, एमएड (इंटिग्रेटेड) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. २० रोजी एम.टेक., एमसीए अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर ५१६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024

पुढारी



कोल्हापूर : राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी बजावणाऱ्या क्रीडापटूंसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आदी.

# राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील खेळाडूंचा गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नागपूर येथे झालेल्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवामधील उज्ज्वल कामगिरीबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

१२ ते १६ जानेवारीदरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २५ वी आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा पार पडली. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स (पुरुष व महिला) संघाने सर्वसाधारण विजेतेपद, बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघाने तृतीय क्रमांक, टेबल टेनिस (पुरुष) संघाने तृतीय क्रमांक, व्हॉलीबॉल (पुरुष) संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यशस्वी क्रीडापटूंचे अभिनंदन केले. क्रीडापटूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी क्रीडा महोत्सव स्पर्धेचे पथकप्रमुख डॉ. सुनील चव्हाण यांनी स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीविषयक अहवालाचे वाचन केले. प्रा. किरण पाटील, प्रा. सुचय खोपडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. राहुळ इंगळे, डॉ. सविता भोसले, डॉ. इब्राहीम मुल्ला, अजय मराठे, सचिन पाटील यांच्यासह क्रीडापटूंचे पालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील विजेत्या संघासमवेत प्रशिक्षक.

# शिवाजी विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शहाजी महाविद्यालयास सात सुवर्ण

कोल्हापूर : शहाजी छत्रपती महाविद्यालयमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पॉवरलिफ्टिंग महिला व पुरुष स्पर्धेत शहाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध गटात सात सुवर्णपदक व दोन रौप्य व एक कास्य पदक पटकावले. स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेती शुक्ला बिडकर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते झाले. यावेळी बिभिषण पाटील उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन जिमखाना प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत पाटील, प्रा. प्रशांत मोटे यांनी केले. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण ६० महाविद्यालयांतील १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
सकाळ



इचलकरंजी : नाईट कॉलेजच्या कबड्डी व अॅथलेटिक्स स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

# नाईट कॉलेजच्या यशस्वी खेळाडूंचा सत्कार

इचलकरंजी, ता. २० : नाईट कॉलेजच्या पाच खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघातून निवड झाली. यातील ओमकार कुंभार याने ओडिशा येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व केलेले होते. तसेच नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये पंधराशे मीटर धावणे या खेळ प्रकारात सुवर्णपदक तर ८०० मीटर धावणेमध्ये रौप्यपदक पटकावले.

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत नाईट कॉलेजच्या चार खेळाडूंची निवड झाली. यामध्ये अर्णव पाटणकर, सुशांत हजारे, आदित्य कांबळे, वैभव निपाणे यांची निवड झाली. खेळाडूंचा चेअरमन अरुणराव खंजिरे, प्राचार्य डॉ. पुरंधर नारे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुरदंडे, सचिव शेखर पाटील यांनी अभिनंदन केले. त्यांना जिमखाना विभागप्रमुख प्रा. बिरनाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2024
तरुण भारत

# विद्यापीठ मार्च-एप्रिल परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याचे व परीक्षांचे वेळापत्रक शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. २३ जानेवारीपासून परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे. तर काही पारंपरिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३१ मार्च व उर्वरीत अभ्यासक्रमांच्या २८ एप्रिलपासून परीक्षा सुरू होणार आहेत. तरी अधिविभाग व महाविद्यालयांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा अधिविभागात विनाविलंब शुल्कासह २३ जानेवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह ९ ते १३ फेब्रुवारी दरम्यान तर अतिविलंब शुल्कासह १५ ते २० फेब्रुवारी दरम्यान परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. विनाविलंब शुल्कासह ८ फेब्रुवारी. विलंब शुल्कासह १४ आणि अतिविलंब शुल्कासह २१ ला परीक्षा अर्ज अॅप्रुव्ह करावयाचा आहे. सर्व परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठात विनाविलंब शुल्कासह १२, विलंब शुल्कासह १६ फेब्रुवारी, अतिविलंब शुल्कासह २३ फेब्रुवारीपर्यंत सादर करावयाच्या आहेत.

- **शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तारखा उपलब्ध**
- **२३ जानेवारीपासून परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ**